**MHKO100013812016**

## <u>आदेश निशाणी क्र. ५८</u>

प्रतिवादी क्र. ३अ व ३ड यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. ३अ व ३ड यांचा अर्ज व वादी यांनी त्याच अर्जावर दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

३. प्रतिवादी क्र. ३अ व ३ड यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांना वेळेत कैफियत व म्हणणे दाखल करावे लागते याचे ज्ञान नसल्याने तसेच काही अपु-या कागदपत्रा अभावी त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आला. त्यांना ४ दिवसांचा विलंब झाला आहे. नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादी यांना आपली कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळावी.

४. वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे त्याच अर्जावर दिले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रस्तुतचा अर्ज कायदयाने मंजूर होण्यास पात्र नाही. अर्जदार यांनी अर्जासोबत कैफियत देणे कायदयाने बंधनकारक असताना तयांनी प्रस्तुतच्या अर्जासोबत कैफियत जोडन दिलेली नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज कायदयाने चालण्यास पात्र नाही.

५. वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ३अ व ३ड यांना दाव्याचे समन्सची बजावणी दिनांक ०७/१०/२०२३ रोजी झाल्याचे दिसून येते. त्यानंतर प्रतिवादी यांनी ९० दिवसांमध्ये न्यायालयात हजर होवून त्यांची कैफीयत देणे आवश्यक होते. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १०/०१/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना त्यांची कैफियत दाखल करण्यास ३ ते ४ दिवसाचा विलंब झाल्याचे दिसून येते.

प्रतिवादी यांनी अर्जामध्ये कथन केल्याप्रमाणे त्यांचा अज्ञानाचा व नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रस्तुत प्रतिवादी क्र. ३अ व ३ड यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल करतेवेळी त्यांची कैफियत अर्जासोबत जोडून दिलेली नाही असे कथन केले आहे. अभिलेखाची पाहणी केली असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ३अ व ३ड यांनी सदर अर्जासोबत पुरसीस दाखल करून प्रतिवादी क्र. ४, ५, ६ तर्फे नि. २६ वर दिलेली कैफियत व म्हणणे स्वीकारले आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज शपथेवर दिला आहे. प्रतिवादी क्र. ३अ व ३ड यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी क्र.३अ व ३ड यांचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. प्रतिवादी यांना त्यांची कैफियत म्हणणे दाखल करण्यास केवळ ३ ते ४ दिवसांचा विलंब झाला आहे. प्रतिवादी यांनी आपली कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर काहीअंशी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**१)** प्रतिवादी क्र. ३अ व ३ड यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये १००/-(अक्षरी रुपये शंभर) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र. ३अ व ३ड यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची प्रस्तुत अर्जासोबत दिलेली पुरसीस त्यांनी प्रतिवादी क्र. ४, ५, ६ तर्फे नि. २६ वर दिलेली कैफियत स्वीकारल्याचे समजून ती पुरसीस अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

DHANASHRI MAHADEV PAWAR
Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2024.07.06 11:07:32 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०५/०७/२०२४

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज